जा. क्र. प्रा/प्राशि/मान्यता/पीआर९६
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१. यांचे कार्यालय.
दिनांक :- 19 JUN 1996

प्रति,

शिक्षणाधिकारी [प्राथमिक],
जिल्हा परिषद, पुणे.

विषय :- सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणे बाबत.

संदर्भ :- शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक व्हीएलएस- १०९५/(२२२) प्राशि-३ दिनांक १८-१-९६ चे पत्र.

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधीन पत्र कृपया अवलोकन करावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तीच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून १९९५ पासून इयत्ता १ली ते सन १९९५-९६च्या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह प्रत्येकी एका तुकडीस प्राथमिक शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विना अनुदान तत्वावर "खास बाब" म्हणून परवानगी देण्यात येत आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना केवळ विनाअनुदान तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाणी | इयत्ता | माध्यम. |
| --- | --- | --- | --- | --- |
| १) | चंद्रकांत दांगटपाटील शिक्षण व क्रिडा मंडळ वडगाव बु।। ता. हवेली | चंद्रकांत मस्केवत दांगटपाटील प्राथमिक शाळा वडगाव बु।। ता. हवेली | इ.१ ली-४थी | मराठी |

२.१. सदर संस्था संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

२.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असली पाहिजे.

२.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यवसायीक अर्हताप्राप्त आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद व शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

२.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती संस्थेकडील भौतीक सुविधा, व्यवस्थापन, विषयक सुविधा इ. शाळा व्यवस्थित चालविण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

२.५. संस्थेने या शाळेसाठी शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अध्यापन, पाठ्यपुस्तके, मूल्यमापन पद्धती, शालेय व सहशालेय कार्यक्रम व उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वित केले पाहीजे. व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

२.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्यावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

२.७ संस्थेने शाळेतील वातावरण आरोग्यानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशीरपणा नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबविणे आवश्यक आहे.

२.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

२.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमीत होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे, नियमाचे पालन करणे आवश्यक आहे.

२.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथ. शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

२.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरू केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

२.१२. शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित शाळा सुरू न केल्यास पुढील वर्षी नुतनी करणासाठी अर्ज सक्षम क्षेत्रीय अधिकाऱ्याकडे [परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे] करणे बंधनकारक राहिल. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

ही परवानगी देण्यापूर्वी संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची पुन्हा खात्री करून घेऊन मगच संस्थेला आपली शाळेची मान्यता देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१] संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी किंवा केवळ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.
३] सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत कुठलेही प्रकरण प्रलंबित नाही.
५] संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.
६] संस्थेने विहित नमुन्यात विनाशुल्क अर्ज केला आहे. [यापूर्वी अर्ज केला नसल्यास तो करून घ्यावा.]
७] शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षा साठी रुपये १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

तरी याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठवावा.

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची सही असे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१. करिता

प्रत- प्रशासन अधिकारी/महानगरपालिका/नगरपालिका
शिक्षण मंडळ, ———— जिल्हा ———— यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत- मा. सचिव,
———— [illegible]
यांना माहितीसाठी अग्रेषित. जि. पुणे